# प्रेसनोट

## सायबर क्राईमचे ईमेलव्दारे होणारे गुन्हयांबाबत

पोलीसांतर्फ नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, सायबर क्राईम सेल येथे वेगवेगळया प्रकारचे गुन्हे वाढलेले आहेत. सध्या सायबर क्राईम मध्ये फेक ईमेलव्दारे होणा-या फसवणुकीचे गुन्हे सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. नागरिकांची फेक ईमेलव्दारे होणा-या आर्थिक फसवणुकीचे प्रकार खालील प्रकारे.

१. भारतीय कंपन्याशी संबंधीत असलेले परदेशी व्यापारी कंपन्याचे ईमेल हॅक करुन परस्पर दोन कंपन्यामध्ये होत असलेले आर्थिक व्यवहाराबाबत माहिती घेऊन परदेशी व्यापारी कंपन्याचे फेक ईमेल आयडी बनवून भारतीय कंपन्यांशी ईमेलव्दारे संपर्क करुन दुस-या बँक अकाऊंटमध्ये पैसे भरण्यास सांगितले जाते. त्यानंतर भारतीय कंपन्याचे लक्षात येते की, सदर आर्थिक व्यवहार हा त्यांच्या परदेशी व्यापारी कंपन्याशी झालेला नसून आपली अज्ञात व्यकतीने आर्थिक फसवणुक केली आहे.

२. परदेशी शिक्षण घेत असलेले भारतीय मुलांचे फेक ईमेल आयडी तयार करुन त्या ईमेलव्दारे त्यांचे भारतात राहणारे पालकांना ईमेल करुन तात्काळ मोठी रक्कम एखादे खात्यामध्ये टाकण्याबाबत सांगण्यात येते. पालकांना आपल्या मुलाला परदेशात पैशांची गरज आहे असे भासल्याने पालक पैसे पाठवितात व अशाप्रकारे आर्थिक फसवणुक होते.

३. एखादया व्यक्तीचा मेल हॅक करुन त्यांचे मित्रांचे ईमेल आयडीवर ईमेल करुन मी परदेशात अडचणीत आहे, तात्काळ परदेशातील मित्र याचे अकाऊंटवर पैसे भरा मी भारतात आल्यावर पैसे देईन असे संदेश पाठवून भारतीय मित्रांना बँक अकाऊंट पैसे ट्रान्सफर करावयास भाग पाडले जाते. अशाप्रकारे मोठया रक्कमेचे आर्थिक फसवणुक केली जाते.

**यावरुन असे दिसून आले आहे की, विविध घटनांमध्ये फसवणुक करणा-या व्यक्ती हया फेक ईमेल आयडी बनवून नागरिकांची आर्थिक फसवणुक करित आहेत.**

**तरी, नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, आपल्याला येणारे ईमेलची प्रथम शाहनिशा करुन ईमेल हे खरे आहे किवा नाही याची खात्री करावी तसेच ईमेल मध्ये असणारी अक्षरांची ओळख करुन घ्यावी त्याशिवाय कोणतेही आर्थिक व्यवहार करु नये.**

----------